प्रति,
मा. संपादक दैनिक ___________________________

कृपया पुढील बातमीस आपल्या वृत्तपत्रात प्रसिध्दी द्यावी.

## - निमाच्या प्रदिर्घ लढ्याला यश. आयुर्वेद व युनानी डॉक्टरांना आधुनिक औषधांचा वापर करण्यास लाभले कायद्याचे संरक्षण -

नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (निमा) हि बी.ए.एम.एस., बी.यु.एम.एस. पदविधारकांची अखिल भारतीय संघटना गेल्या ६४ वर्षांपासून राज्यातील आयुर्वेद व युनानी पदविधारकांच्या हक्कांसाठी लढत आहे. राज्यातील सर्व पदविधारक हे MMP Act 1961 अंतर्गत नोंदणीकृत आहेत. निमा संघटनेच्या प्रयत्नांनी राज्य शासनाने १९९२ व १९९९ ड्रग व कॉस्मेटिक अक्ट १९४५ मध्ये सुधारणा करुन अध्यादेशाद्वारे आयुर्वेद व युनानी पदविधारकांना अलोपॅथी प्रक्टीस करण्याची परवानगी दिली आहे. या अध्यादेशांचे कायद्यांत रुपांतर होणे आवश्यक होते. त्यासाठी निमा संघटना ही MMP Act 1961 मध्ये सुधारणा करण्यास आग्रही होती. महाराष्ट्रभर संघटनेने अनेक आंदोलने यासाठी उभी केली. मा.ना. नारायणराव राणे साहेबांच्या यशस्वी मध्यस्तीनंतर मा.आ. विजयकुमार गावीत यांनी निमाच्या पदाधिका-यांचे म्हणणे राज्य सरकारकडे मांडले. राज्यातील ८४ हजार पदविधारकांना न्याय मिळावा व आधुनिक वैद्यक शास्त्राचा वापर करणे संबंधी कायद्यात सुधारणा व्हावी यासाठी राज्य सरकारने MMP Act 1961 मधील कलम २५ मध्ये उपनियम (iv) व (v) याचा अंतर्भाव करण्यात आला. राज्याच्या पावसाळी अधिवेशनात सदर कायदे दुरुस्ती वैद्यकीय शिक्षण मंत्री मा.ना.श्री.जितेंद्र आव्हाड व राज्यमंत्री मा.ना.श्री.डी.पी. सावंत यांनी महाराष्ट्र राज्य विधानसभेत व विधानपरिषदेत मंजुरीसाठी ठेवली व सभागृहात सर्वानुमते मंजुर करण्यात आली. आज निमाच्या २५ वर्षांच्या लढ्याला यश मिळाले आहे.

सदर कायदा दुरुस्ती होणेसाठी निमाचे सर्व राज्य शाखा पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य व सदस्यांनी अथक परिश्रम करीत राज्य शासनाचा वेळोवेळी अनेक वर्षे पाठपुरावा केला अशी माहिती महाराष्ट्र राज्य शाखेचे अध्यक्ष डॉ. मनोहर जुमळे, सचिव डॉ. शैलेश निकम, कोषाध्यक्ष डॉ. राजाराम जाधव यांनी दिली. या कायदे दुरुस्तीने आयुर्वेद पदविधारक व पदव्युत्तर डॉक्टरांना आधुनिक वैद्यक शास्त्राचा वापर करण्याची परवानगी मिळाली आहे. त्यासाठी निमा राज्य शासनाचे प्रसिध्दी पत्रकाद्वारे अभिनंदन करीत आहे.

***कायदे दुरुस्ती काय ?***

***MMP Act 1961 मधील अधिनियम २५ अंतर्गत उपनियम (iv) हा पदविधर व उपनियम (v) हा पदव्युत्तर पदविधारकांसाठी मंजुर करण्यात आला आहे.***

***"i(v) the registered practitioners of Indian Medicine & holding the qualifications mentioned in the PART A, A-1, B & D of the schedule shall have previlege to practice the modern scientific medicine known as allopathic medicine to the extent of the training they recieved in that system, alongwith the system of Indian Medicine for which they are registered.***

***(v) the registered practitioners of Indian Medicine & holding the qualifications mentioned in the PART A, A-1, B & D of the schedule and holding post-graduate qualification which is entered as additional qualification in the register prepared under section 17 shall be eligible to pursue and practice the latest knowledge, skill and technological advances to the extent of the training they recieved during the post-graduation."***

धन्यवाद.

आपले,



डॉ. शैलेश शिवाजी निकम
महासचिव, एन्.आय्.एम्.ए., महाराष्ट्र राज्य